# तुमच्या संकल्पाला साकार रूप द्या

१ जानेवारी, २०१९

आत्मीय वाचकांनो,

नूतन वर्षाभिनन्दन! പുതുവത്സരാശംസകൾ

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! *Bonne Année!*

あけましておめでとうございます

*Feliz Ano Novo! ¡Feliz Año Nuevo!*

*Ein frohes Neues Jahr! Felice Anno Nuovo!*

लोकांशी जोडले जाणे, त्यांच्याशी संवाद साधत राहणे मला नेहमीच आवडते आणि त्यामुळे मला वाटते की, २०१९ हे वर्ष माझ्यासाठी अद्यापपर्यंतचे 'सर्वोत्तम' वर्ष असणार आहे — कारण, आता माझ्याकडे तुम्हा सर्वांशी, माझ्या प्रिय वाचकांशी संवाद साधण्याचे एक अतिशय उत्तम साधन उपलब्ध आहे. वर्ष २०१९मध्ये या पत्रांद्वारे मी तुमच्याशी संवाद साधणार आहे याचा मला अतिशय आनंद होतो आहे. सिद्धयोग मार्गावर ही पत्रे प्रत्येक महिन्याचा परिचय करून देतात आणि त्या प्रत्येक महिन्याचा उत्सव साजरा करतात. या पत्रांमधून मी समयोचित माहिती, कथा, लघुकथा, शिकवणी आणि म्हणी तुमच्यापर्यंत पोहोचवणार आहे आणि त्याबरोबरच गेली ४९ वर्षे सिद्धयोग मार्गावर वाटचाल करत असताना मी माझ्या गाठीशी बांधलेले माझे अनुभव, माझ्या अंतर्दृष्टी आणि माझे मननचिंतनदेखील तुम्हाला सांगणार आहे. माझी अशी इच्छा आहे की, या पत्रांद्वारे सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर आता काय येऊ घातले आहे याची झलक तुम्हाला प्राप्त व्हावी — आणि तुमच्या शोधातून, अन्वेषणातून आणि शिकण्यातून तुम्हाला जी आंतरिक समज व अनुभव प्राप्त होणार आहेत यांचीही एक झलक तुम्हाला मिळू शकावी. या सुमधुर यात्रेचा आस्वाद घ्या! *एक अनुपम यात्रा।*

पुन्हा एकदा, नूतन वर्षाभिनंदन! आपण जीवित असल्याचा आनंद तुम्हाला होत नाही का? जागृत असल्याचा? सचेत असल्याचा? अजून एक फलदायी जीवन सुरू करण्यास आपण तयार असल्याचा

अनुभव तुम्हाला येत नाही का? ही तुम्हाला मिळालेली भेट आहे असे तुम्हाला वाटत नाही का की, आजच्या दिवशी एका 'नूतन' दिवशी तुमच्याकडे एक संधी आहे, तुम्हाला तुमचे जीवन पुन्हा नव्याने सुरू करता येण्याची संधी? 'नूतन आरंभ' या शब्दसमूहात एक मंजुळ निनाद आहे, होय ना?

तर मग चला, सुरुवात करू या!

वर्ष २०१९च्या या पहिल्या दिवशी, आपणा सर्वांना सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये गुरुमाईंचा संदेश प्राप्त झाला आहे, किती भाग्यवान आहोत आपण! किती भाग्यवान आहोत आपण सर्व की, आपण त्या काळात जगतो आहोत आणि त्याच हवेत श्वासही घेत आहोत जिच्यात श्रीगुरुमाई श्वास घेत आहेत! किती भाग्यवान आहोत आपण सर्व की, साधनेत मार्गदर्शन करण्यासाठी आपल्याकडे त्यांचा नववर्ष संदेश आहे! गुरुमाईंच्या संदेशातील शिकवणी शिकण्याची व पुन्हा शिकण्याची, त्या शिकवणी आत्मसात करण्याची व पुन्हा आत्मसात करण्याची, त्यांना कार्यान्वित करण्याची व पुन्हा कार्यान्वित करण्याची संधी आता आपल्याला मिळणार आहे, हा विचार रोमांचकारी, मंत्रमुग्ध करणारा आहे, तो उद्‌बोधकही आहे. एक गोष्ट जी माझ्या लक्षात आली आहे ती ही आहे की, गुरुमाईंची एखादी शिकवण मी ज्या वेळी वाचते किंवा ऐकते, त्या वेळी ती नेहमी मला थेट आणि अगदी स्पष्ट रूपाने त्या अनुभवाशी जोडते, जो अनुभव फक्त काही दिवसांपूर्वी, काही आठवड्यांपूर्वी तसेच महिन्यांपूर्वी किंवा वर्षांपूर्वी मला आला होता. माझ्या साधनेविषयी पुन्हापुन्हा पुष्टी मिळत राहणे मला खूप आवडते; ते माझ्या संपूर्ण अस्तित्वाला आनंदाने रोमांचित करते. *जब हमारी साधना का पुष्टिकरण होता है तो उसका आनन्द अनोखा होता है, है न?*

असीम कृतज्ञतेने माझे हृदय आर्द्र झाले आहे आणि मी या दोन ओळी गुणगुणते आहे; या ओळी मराठी भाषेतील एका भजनातील आहेत, ज्यामध्ये सद्‌गुरूंचे स्तुतीगान केले गेले आहे. महाराष्ट्र राज्यात स्थित असलेल्या निगडी या गावातील संतकवी श्री रंगनाथ स्वामी यांनी या भजनाची रचना केली आहे. या ओळी अत्यंत काव्यात्मक स्पष्टतेसह माझ्या हृदयातील भावाचे वर्णन करतात :

> धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची,
> झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची।

> सद्‌गरूंना घातलेली प्रदक्षिणा — ही एक अभिव्यक्ती असते खोलवर रुजलेल्या आणि अविरत अशा कृतज्ञता भावाची, भक्तीची, प्रेमाची, आराधनेची — ही सर्वाधिक आशीर्वादपूरित, धन्यता प्रदान करणारी घटना असते. या पावन पूजाविधीचे साक्षी होण्यासाठी आणि त्यात सहभागी

होण्याच्या इच्छेने देवी-देवतादेखील त्यांच्या दिव्य विमानांनी पृथ्वीवर अवतरित होण्यास अधीर असतात.[१]

* * *

जगातील प्रत्येक संस्कृतीची, प्रत्येक समाजाची, प्रत्येक व्यक्तीची आपलीच अशी एक रीत असते नूतन वर्ष साजरे करण्याची आणि स्वतःसाठी निर्धारित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी त्या दिशेने नव्याने प्रयत्न करण्याचा संकल्प करण्याची. सिद्धयोग मार्गावर, आपल्या विचारांना, आपल्या संकल्पांना, आपल्या कृतींना नववर्षाच्या दिवशी नव्या ऊर्जेने भरून टाकण्याचे महत्त्व आपण शिकलो आहोत. आपले हे सौभाग्य आहे की, गुरुमाईंकडून आपल्याला नित्यनवीन मार्गदर्शन प्राप्त होत असते, जे आपल्याला आधार देईल आपल्या सद्‌गुणांना पोषित करण्यासाठी आणि त्यामुळे ते सद्‌गुण झगमगत आपल्या सभोवती नृत्य करतील. अशी मंगल कामना की, साधनेशी वचनबद्ध राहण्याचा आपला *ज़ज्बा* अर्थात् ध्यास, उत्साह आणि पराक्रम नित्यनूतन राहो.

तुम्हाला माहितच आहे की, नूतन वर्षाचा अरुणोदय अगणित संभावना घेऊन येतो — आणि ज्या संभावना आपणास प्रत्यक्षात आणायच्या आहेत, त्या संभावनांची निवड करणे व त्यांच्यावर एकाग्र होण्यासाठी प्रयत्न करणे ही आपली जबाबदारी आहे. का? तर आपल्याला धर्मसंगत जीवन जगण्याचे बळ प्राप्त व्हावे.

प्रत्येक नवीन श्वास प्रत्यक्षात जीवनाच्या आश्वासनाची परिपूर्ती करत असतो. प्रत्येक क्षण अपेक्षेने धडधडत असतो, प्रत्येक क्षण कोणत्याही प्रयत्नाचा आणि अवघ्या प्रयत्नांना यश देण्याच्या आश्वासनाने स्पंदित असतो. मी माझ्यासाठी हा एक अभ्यास बनवला आहे की, प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला या सर्वाचा काळजीपूर्वक मागोवा घ्यायचा की, साधनेत आणि धर्मसंगत जीवन जगण्याच्या माझ्या प्रयत्नात मी जी प्रगती केली आहे त्याचा पाठपुरावा करून ते लिहून काढणे — असे मी मोक्षप्राप्तीचे माझे लक्ष्य गाठण्याच्या तीव्र उत्कंठेने करते. तुम्ही निश्चितच आपला नवीन वर्षाचा संकल्प बनवला असेल. आणि, तुमची संमती असल्यास, आणखी एक संकल्प बनवण्याची शिफारस करायला मला आवडेल. तुमची सिद्धयोग साधना करत असताना, तुम्हाला लागलेल्या आश्चर्यकारक शोधाचे नवीन अध्याय तुमच्या जर्नलमध्ये [दैनंदिनी] लिहिण्याचा संकल्प तुम्ही करा — दररोज किंवा प्रत्येक आठवड्याला. तो एक शब्द असेल, वाक्प्रचार असेल, एक ओळ किंवा एक पूर्ण प्रसंगही असू शकतो — तुमच्या इच्छेनुसार तुम्ही तो लिहा. तो तुमचा व्यक्तिगत खजिना असेल. *इसे अविस्मरणीय बना लें।*

लहानपणी मला लागलेल्या अशाच एका आश्चर्यकारक शोधाची गोष्ट मला तुम्हाला सांगायची आहे, या शोधाने श्रीगुरूंच्या शब्दसामर्थ्याविषयीच्या माझ्या धारणेला अर्थपूर्णता प्रदान केली. भारतात, लखनऊमध्ये मी लहानाची मोठी झाले. १ जानेवारीला प्रत्येक नववर्षाचे स्वागत मी आणि माझ्या कुटुंबाने घरी गुरुगीता पाठ करून केले आहे, ज्याची समाप्ती एका हवनाने होत असे. एकदा, आम्ही वैदिक मंत्रांचे पठण करत अग्नीला आहुती अर्पण करत होतो, जे मंत्र मला आणि माझ्या भावंडांना आई रोज झोपण्यापूर्वी शिकवत असे.

त्या पवित्र अग्नीतून निर्माण होत असलेली धुराची सुगंधी वलये आमच्या सभोवतालचे वातावरण शुद्ध करत होती, अगदी त्याचप्रमाणे, ज्याप्रमाणे मंत्रांचा ध्वनी आमचे अंतरंग शुद्ध करत होता. जरी मी लहान बालिका होते आणि पठण करीत असलेल्या किंवा ऐकत असलेल्या मंत्रांच्या शक्तीविषयीची समज मला नव्हती, तरीही त्यांचा ध्वनी ऐकत असताना माझ्या हृदयात उदित होणाऱ्या भावनने मला मंत्रमुग्ध केले होते. एका सुंदर प्रशांतीने माझा ताबा घेतला होता. प्रत्येक जण आणि प्रत्येक वस्तू प्रेमाने आणि आनंदाने झगमगू लागली होती. हा अनुभव किंवा मंत्रांची स्पंदने कधीच लुप्त होऊ नयेत असे मला वाटत होते. *मुझे मन्त्रों ने मुग्ध कर लिया।*

मी अनेक सिद्धयोगींना असे सांगताना ऐकले आहे की, त्यांचा सिद्धयोग मार्गाशी प्रथम परिचय श्रीगुरुगीतेच्या पाठाने झाला. आणि शब्दांच्या अर्थाविषयी आणि त्यांचे पठण का केले जाते आहे याविषयी ते जरी अनभिज्ञ असले, तरीही त्या पवित्र मंत्रांचे ध्वनी ऐकल्याने त्यांना अतिशय स्पष्ट आणि सर्वाधिक गहन आध्यात्मिक अनुभव येत असत.

गुरुमाई म्हणतात, "मंत्राच्या शक्तीत संपूर्ण ब्रह्मांडाची रहस्ये सामावलेली आहेत."[२] केवळ मंत्रजप करून आणि त्यांचे श्रवण करून मंत्राचे दर्शन आपल्याला घेता येऊ शकते.

पवित्र मंत्राप्रमाणेच एका महान आत्म्याचे, एका सिद्धाचे वचन हेदेखील प्रत्यक्षात परम सत्यच असते. एक सिद्धगुरू ब्रह्माशी ऐक्याच्या स्थितीत अवस्थित झालेले असतात. श्रीगुरुमाई परम सत्याचे मूर्त स्वरूप आहेत.

म्हणून, सिद्धगुरु जे काही बोलतात — त्यांच्या श्रीमुखातून निघालेला प्रत्येक शब्द, त्यांचे प्रत्येक वाक्य — हे सदैव परम सत्याच्या शक्तीने व्याप्त असतात; तो मंत्र असतो. हिंदीमध्ये एक म्हण आहे : 'श्रीगुरु के शब्द कभी ख़ाली नहीं जाते' म्हणजेच 'श्रीगुरूंचे शब्द कधीही व्यर्थ जात नाहीत' म्हणूनच, ते तुमच्या जीवनात परम सत्याच्या स्वरूपात प्रकट होतील. तुमची किस्मत पालटून टाकण्याची अपरंपार शक्ती श्रीगुरूंच्या शब्दात सामावलेली असते.

आज आपल्याला वर्ष २०१९साठी गुरुमाईंचा संदेश प्राप्त झाला आहे. या शब्दांमध्ये निहित शक्ती, त्यांचे महत्त्व आणि त्यांच्या आशीर्वादांच्या प्रज्ञानासह आपण त्यांचा बोध धारण करू या. आपण खोलवर आणि अधिकाधिक खोलवर बुडी मारणे चालू ठेऊ या आणि या संदेशाच्या संकल्पाला आपल्या जीवनात साकार रूप देऊ या.

* * *

आता माझ्याकडे तुम्हाला सांगण्यासाठी एक अतिशय चांगली बातमी आहे. तुम्ही तयार आहात का त्यासाठी? सिद्धयोग मार्गावरील आपल्या साधनेला आधार देण्यासाठी 'मधुर सरप्राइझ्' २०१९ सिद्धयोग वेबसाइटवर संपूर्ण वर्षभर उपलब्ध राहील! होय! तुम्ही अगदी बरोबर वाचले आहे — सिद्धयोग वेबसाइटवर, संपूर्ण वर्षभर. यासाठी रजिस्टर कसे करायचे आणि यात पुन्हापुन्हा सहभागी कसे व्हायचे याविषयीच्या अधिक माहितीसाठी तयार राहा.

याशिवाय, या महिन्यात सिद्धयोग वेबसाइटच्या मुख्य पृष्ठावर [होमपेजवर] एक लिंक प्रस्तुत केली जाणार आहे, ज्यात साधनेला उपयुक्त अशा विविध प्रकारच्या अभिनव साधनसामग्रीची माहिती तुम्हाला उपलब्ध होईल. ही साधने तुम्हाला गुरुमाईंच्या वर्ष २०१९च्या संदेशाचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याला आचरणात आणण्यासाठी मदत करतील. माझ्यासाठी एक साहाय्यक आणि उपयुक्त तंत्र हे राहिले आहे की, छोटी, विशिष्ट आणि सुनियोजित पावले उचलणे, जसे करण्यास गुरुमाईंनी आपल्याला शिकवले आहे. 'सिद्धयोग होम स्टडी कोर्स : सिद्धयोग चिंतन की शक्ति'चा अकरावा पाठ 'ज्ञान को कार्यान्वित करना' यामध्ये ही पद्धत स्पष्टपणे समजावून सांगण्यात आली आहे. तुमच्यापैकी ज्या कोणी या तंत्राचा अवलंब केला असेल, त्यांना निश्चितच त्याचे फायदे माहिती असतील. आणि तुमच्यातील ज्यांच्यासाठी हे तंत्र नवीन असेल त्यांना मी प्रोत्साहित करते की, त्यांनी गुरुमाईंच्या संदेशाचा अभ्यास करण्यासाठी याचा उपयोग अवश्य करावा.

सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर तुमच्यासाठी इतरही अनेक गोष्टींचा खजिना साठवून ठेवण्यात आला आहे. त्यातील एकेकाचा शोध घेण्याचा आनंद घेण्याची जबाबदारी मी तुमच्यावर सोपवते. पण मी तुम्हाला हा संकेत निश्चितच देईन : आपणा सर्वांना खूप छान तऱ्हेने सांगितलेली गोष्ट आवडते की नाही, जी तिच्यात असलेल्या मूलभूत शिकवणीला नवचैतन्य प्रदान करते? किंवा एखाद्या संतकवीचे प्रज्ञान, जे त्यांच्या काव्यांमधून झळकते आणि त्या काव्यांमध्ये गुंफलेले परम सत्य इतके सुलभ बनवते की, आपल्याला त्याचे आकलन होऊ शकेल? वेबसाइटवर तुम्ही प्रस्तुत केलेल्या तुमच्या स्वतःच्या

अनुभवांच्या माध्यमातून मला हे कळवायला विसरू नका की, तुम्ही दररोज, प्रत्येक महिन्याला वेबसाइटचे समन्वेषण करत असताना तुम्हाला कशाचा शोध लागला आहे.

सिद्धयोग मार्गावर जानेवारी महिना सिद्धयोग मार्गावरील फक्त एकच नाही, तर *तीन* अतिशय महत्त्वाचे उत्सव घेऊन येतो. १ जानेवारी, अर्थात तो दिवस ज्या दिवशी आपण सर्वप्रथम 'मधुर सरप्राइझ्'मध्ये सहभागी होतो. ७ जानेवारी, ही त्या दिवसाची वर्षगाठ आहे, ज्या दिवशी बाबा मुक्तानंदांनी गुरुदेव सिद्धपीठाच्या दैनिक कार्यक्रमात 'श्रीगुरुगीतेच्या' पाठाचा समावेश केला. आणि १४ जानेवारीला आपण मकरसंक्रांतीचा सण साजरा करतो — ज्या दिवशी सूर्यदेवता उत्तरेकडील यात्रेला आरंभ करतात, ज्या यात्रेला 'उत्तरायण' म्हटले जाते. भारतातील महाराष्ट्र राज्यात, मकरसंक्रांतीच्या सणाला लोक एकमेकांना तीळ आणि गूळापासून बनवलेले लाडू वाटतात व तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला' या शुभेच्छांचे आदानप्रदान करतात. किती शुभ पद्धत आहे ही वर्ष २०१९चा आरंभ करण्याची! शुभारम्भ!

* * *

तुमचा निरोप घेण्यापूर्वी मला एक विचार प्रस्तुत करावासा वाटतो. श्रीभगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णाचा शिष्य अर्जुन एक अतिशय सुंदर विधान करतो. या स्वर्णिम मार्गावर श्रीगुरुमाईंची शिष्या असण्याच्या नात्याने मला या विधानाशी एक प्रकारे जोडले गेल्यासारखे वाटते. मी प्रथम त्याविषयीचे एक विस्तृत चित्र सादर करून मग त्या विधानाकडे वळेन. भगवान श्रीकृष्ण जेव्हा अर्जुनाला त्यांच्या शिकवणी प्रदान करत होते, तेव्हा त्यांची एकच इच्छा होती — की त्या शिकवणींमध्ये निहित असलेले प्रज्ञान आणि परम सत्य अर्जुनाला पाहता यावे व त्याला ते समजावे. असे का? त्यांची इच्छा होती की, अर्जुनाने परम सत्याच्या स्थितीत अवस्थित व्हावे, जेणेकरून अर्जुनाला त्याच्या धर्ममार्गाचे आकलन व्हावे आणि त्या मार्गाचे अनुसरण त्याला पराक्रमाने आणि न डगमगता करता यावे.

एकदा जेव्हा भगवान कृष्णांच्या गहन शिकवणींचे आकलन अर्जुनाला पूर्णतया झाले आणि त्याने त्या आत्मसात केल्या, तेव्हा त्याने त्या शिकवणींमधील निहित सत्य जाणले आणि त्याची अनुभूती घेतली. आणि तो अनुभव धारण करण्यास एकदा तो पात्र झाल्यावर भगवंताने आपले दिव्य स्वरूप अर्जुनासमोर प्रकट केले. अर्जुनाचे हृदय कृतज्ञतेने भरून गेले. तो त्याचा धर्ममार्ग आता स्पष्टपणे पाहू शकत होता. आणि म्हणून अर्जुनाने आपले श्रीगुरू, भगवान कृष्णांप्रति आपली वचनबद्धता अशा या शब्दांमध्ये व्यक्त केली : करिष्ये वचनं तव! म्हणजेच 'मी तुमच्या आज्ञेचे पालन करेन.'

एका श्रीगुरूंची आपल्या शिष्यासाठी अशीच कामना असते की, एका शिष्याने ब्रह्माशी ऐक्याची ती परमानंदपूर्ण स्थिती साध्य करावी, जिच्यात ते स्थापित झाले आहेत. मी या नितांत सुंदर, औदार्यपूर्ण, दिव्यातिदिव्य कामनेच्या पाठीशी निहित असलेल्या अपार प्रेमाविषयी व करुणेविषयी जेव्हा विचार करते आणि मला माझ्या अंतःकरणावर होणारा त्यांचा स्नेहपूर्ण व सौम्य स्पर्श जेव्हा जाणवतो, तेव्हा मला तो प्रत्येक प्रयत्न करावासा वाटू लागतो ज्यामुळे माझ्याप्रति असलेल्या माझ्या गुरूंच्या मनोकामनेला साकार रूप यावे. आणि म्हणून माझ्या नववर्षासाठी असलेल्या शुभकामनांपैकी एक शुभकामना ही आहे की, तुमचा गुरुमाईंच्या प्रेमाचा अनुभव तुमच्या कल्पनेच्याही पलीकडे जावो.

*अगले महीने फिर मिलेंगे, इसी जगह। मिलना ज़रूर याद रखें।*

पुढील महिन्यात आपण पुन्हा संवाद साधू. तोपर्यंत आपला वेळ आनंदाने व्यतीत करण्याचे स्मरण ठेवा!

कृतज्ञतापूर्वक,

गरिमा बोरवणकर

---

[१] इंग्रजी भाषांतर ©२०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन.

[२] गुरुमाई चिद्विलासानंद, *Kindle My Heart,* rev.ed. [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस.वाय.डी.ए. फाउंडेशन, १९९६] पृष्ठ २३६.

© २०१८ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.